# शिकाल तर टिकाल!

ँ प्रशिक्षणामुळे तुमच्या आत्मविश्वास वाढतो. तुम्हाला कंपनीबद्दल सविस्तर माहिती मिळते. नॉलेज मीळते, नवनवीन कल्पना वापरुन व्यवसाय कसा करावा याचं ज्ञान मिळते. रहाणीमान कसं असाव अपयशामागील कारणे, यशाचे फॉर्मुले व सर्वात महत्वाचे म्हणजे आनंदी जीवन कसे जगावे व इतरांनाही आनंद कसा द्यावा हे शिकायला मिळत.

यशस्वी होण्यासाठी माणसांने नेहमी शिकत रहायला पाहिजे. ''तुम्ही जे यापुर्वी शिकला होतात. आता आपण शिकण बंद केलं, तर येणाऱ्या दिवसात तुम्हाला अज्ञानी (अनपढ) म्हणून संबोधले जाईल''. म्हणून कायम स्वतःला अपडेट ठेवा. जनरल नॉलेज, विविध कौशल्ये आत्मसात करा. मी गेली अनेक वर्षे 'मिशन कामयाबी'च्या माध्यमातून अशी कौशल्ये (सॉफ्ट स्किल) शिकवतो व स्वतः शिकत असतो. मी दर महिन्याला नवीन ३ नविन पुस्तके विकत घेवून वाचतो. हे मी गेली १० वर्षे करीत आहे. आत्तापर्यंत मी ३५० पेक्षा जास्त पुस्तके वाचली आहेत व त्यामुळेच आजपर्यंत माझी ७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मी लाखो रुपये ज्ञान मिळविण्यासाठी गुंतविले आहेत. (तुमच्या भाषेत खर्च केले आहेत)

''पैशाचे रक्षण आपल्याला करावे लागते, परंतु ज्ञान आपले रक्षण करते'' हे मला चांगले ठाऊक आहे. म्हणूनच अनुभवाचे बोल आपणासमोर मी मांडत आहे. म्हणून माणसाने नेहमी शिकत रहायला पाहिजे, म्हणूनच म्हणतात शिकाल तर टिकाल.

तुमची हुशारी व कौशल्ये ही तुमच्या हाताखाली किती हुशार माणसे आहेत. यावर अवलंबून असते. - आर्थर क्रॉक

**- डॉ. संतोष कामेरकर**
मोटिव्हेशनल गुरु
९८२००८६७३०

**आम्ही बिघडलो तुम्ही बि-घडा-ना** या स्पर्धेतील विजेत्यांची नांवे

प्रथम - कु. ऋचा प्रभाकर कोलते

द्वितीय - सौ. आर्या अमित कोठावळे

तृतीय - कु. निनाद प्रभाकर कोलते

उत्तेजनार्थ - सौ. स्नेहा सुजाण शेटये

## वरील सर्व विजेत्यांचे *हार्दिक अभिनंदन!*

परिक्षक

**श्री. प्रदीप गांगण** (सचिव, कोकणस्थ (सं) वैश्य समाज)

**सौ. अनुजा गांधी** (शाखाधिकारी - वैश्य सहकारी बँक लि.)

**श्रीमती इंदुमती पेठे** (राष्ट्रीय महिला अध्यक्षा - न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था)

**डॉ. संतोष कामेरकर,** (लेखक - प्रायोजक)

बक्षिसासाठी संपर्क - ९८२००८६३७०